# कि.फौ.अर्ज.क्र. २६९/२०१८ मधील नि. क्र. ८ येथील अर्जावरील आदेश.

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत जाब देणार क्र. १ याने अर्जदार हिला दरमहा २०,०००/– रुपये अंतरिम पोटगी देणेबाबत, तसेच जाबदेणार यांनी अर्जदारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये तसेच ती रहात असलेल्या घरात प्रवेश करु नये व प्रस्तूत अर्जाचा खर्च रक्कम रु. २०,०००/– मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. जाबदेणार यांनी नि. क्र. २१ येथे म्हणणे दाखल करुन अर्जास प्रतिरोध केला आहे व सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जासंबंधीचे अर्जदार व सदरील जाबदेणार यांची परस्पर विरोधी कथने व प्रतिकथने, अभिलेखावरील महत्वाचे दस्तऐवज यांचे काळजीपूर्वक अवलोकन करता निम्नलिखित मुद्दे माझे विचारार्थ प्रस्थापित झाले असून तत्संदर्भीचे निष्कर्ष मी तद्नंतर सकारण लेखनिविष्ट केले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | जाबदेणार यांनी अर्जदार हिला कौटुंबिक हिंसाचाराची वागणूक दिली हे अर्जातून प्रथमदर्शनी स्पष्ट होते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जामध्ये मागितलेले अंतरीम अनुतोष मिळणेस अर्जदार पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणीमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता –**

३. अर्जदार हिने मूळ अर्ज कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे. मुळ अर्ज अभिलेखावर पुरावा आल्यानंतर अंतीम टप्प्यावर निकाली काढता येईल. मात्र प्रस्तुतचा हा अंतरीम अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार अंतरीम अनुतोष मिळणेसंबंधी दाखल केला असल्याने तो अर्ज

निकाली काढतेवेळी जाबदेणार यांनी अर्जदार हिला कौटुंबीक हिंसाचाराची वागणूक दिली हे अर्जातून प्रथमदर्शनी स्पष्ट होते काय एवढेच तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरेल.

४. अर्जदार व जाबदेणार यांचेतील नातेसंबंध जाबदेणार यांनी मान्य केलेले आहेत. अर्जदार क्र.१ हिच्या कथनानुसार जाबदेणार यांनी अर्जदार हिस सुरुवातीचे थोडे फार दिवस कसेबसे नांदविले. त्यानंतर किरकोळ कारणावरुन व लग्नात करणी–धरणीच्या विषयावरुन अर्जदार हिस वादविवाद व भयंकर स्वरुपाची मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास देत होते. अर्जदार हिला नांदण्याची इच्छा असल्यामुळे ती सर्व सहन करुन नांदत होती. जाबदेणार क्र. १ हा हैद्राबाद येथे नोकरीस असल्यामुळे त्याने अर्जदार हिस 'तूला जर माझेजवळ नांदणेचे व रहायचे असेल तर हैद्राबाद येथे फ्लॅट खरेदी करण्यासाठी तूझे वहिडलांकडुन ५ लाख रुपये घेवून ये' असे म्हणून अर्जदार हिस सर्व जाबदेणार यांनी उपाशीपोटी ठेवून शिवीगाळ, मारहाण, जाचहाट व छळ करीत होते. त्यावर अर्जदार ही तिचे आई वडिलांची परिस्थिती गरीबीची आहे, त्यामुळे तुमची मागणी ते पूर्ण करु शकणार नाहीत असे समजावून सांगत होती. पण तरीही त्यांच्या वागण्यात व बोलण्यात कांहीही फरक पडला नाही. त्यानंतर त्यांनी जानेवारी–२०१५ मध्ये फ्लॅट खरेदीसाठी पाच लाख रुपये आणलेशिवाय नांदविणार नाही असे म्हणून अर्जदार हिला तिच्या माहेरी हाकलून दिले.

५. त्यानंतर दि. ०२/०५/२०१६ रोजी सर्व जाबदेणार यांनी अर्जदार हिचे आई–वडिलांचे घरी येवून अर्जदार हिला मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे अर्जदार हिने त्यांचेविरुध्द दि. ०३/०५/२०१६ रोजी सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. त्यानंतर जाबदेणार यांनी पुन्हा दि. २६/०६/२०१६ रोजी अर्जदार हिचे माहेरी येवून को–या स्टॅम्पवर सही कर म्हणून धक्काबुक्की व मारहाण करुन सोडचिठ्ठी देणेची मागणी केली. त्यानंतरही अर्जदार स्वतः, तिचे आई–वडिलांनी व मध्यस्थी लोकांनी नांदविण्यास पाठविणेचा प्रयत्न केला असता नांदवून घेतले नाही. जाबदेणार यांनी अर्जदार हिला हाकलून दिल्यापासून तिच्या उदरनिर्वाहाची, औषधपाण्याची कसल्याही प्रकारे सोय केलेली नाही. त्यामुळे ती झालेल्या मारहाणीमुळे व मानसिक त्रासामुळे ती अशक्त झाली असुन तिला

कोणताही कामधंदा होत नाही व तिचा उपासमार होत आहे. सदर कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदार हिने निशाणी ०६ वर तिचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. जाबदेणार यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. परंतु, संरक्षण अधिकारी यांनी त्यांचा अहवाल निशाणी ०८ वर दाखल केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर अहवालामध्ये जाबदेणार यांनी अर्जदारवर केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराची घटना स्पष्टपणे नमूद केलेल्या आहेत. सदर अहवाल चूकीचा असल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा जाबदेणार यांनी न्यायालयात सादर केलेला नाही. सबब, अर्जदाराचे शपथपत्र निशाणी ०६ व संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक हिंसाचाराचा अहवाल निशाणी ०८ यावरुन जाबदेणार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्र. २ करीता –**

६. मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत जाबदेणार क्र. १ याने अर्जदार यांनी दरमहा २०,०००/– रुपये अंतरिम पोटगी देणेबाबत आदेश करण्याची अर्जदार यांनी विनंती केली आहे. त्यांनी मूळ अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये नमूद केले आहे की, जाबदेणार क्र.१ हा हैद्राबाद येथे जे.व्ही.के.बायोकेमिकल या कंपनीमध्ये केमिस्ट म्हणून नोकरीस असुन त्यास दरमहा ६०,०००/– रुपये इतका पगार आहे. तसेच जाबदेणार यांची मौजे पिसेवाडी व गळवेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली येथे ७० एकर बागायत जमीन आहे. त्यातून जाबदेणार यांना खर्चा वजा जाता ५० ते ६० लाख रुपये एवढे उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार यांना जर्सी गायी, म्हशी, शेळया व कोंबडया यापासून खर्च वजा जाता वर्षाला १० ते २० लाख रुपये उत्पन्न मिळते. जाबदेणार हा शरिराने धडधाकट आहे व त्याचेवर कोणीही अवलंबून नाहीत. त्यामुळे त्याची अर्जदार हिला सर्व प्रकारच्या सुविधा पुरविण्याची ऐपत व कुवत आहे. याउलट, जाबदेणार क्र. १ याने त्याचे म्हणण्यामध्ये जाबदेणार क्र. १ व २ हे मोलमजुरी करुन त्यांचे कुटूंबाची उपजिवीका करीत आहेत. अर्जदार ही बीसीएस असुन ती सांगोला येथे नोकरी करीत आहे व तिला दरमहा १०,०००/– रुपये पगार आहे व तिला शिवणकामापासून दरमहा ५,०००/– रुपये मिळतात. त्यामुळे सदर रक्कम तिला उदरनिर्वाहाकरीता पुरेसी

आहे. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज रद्द करण्यात यावा असे प्रतिकथन केले आहे.

७. जाबदेणार क्र. १ याने अर्जदारच्या उत्पन्नाबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही. याउलट, जाबदेणार क्र.१ यास शारिरीक अगर मानसिक अपंगत्व असल्याचे कथन जाबदेणार यांनी केलेले नाही. शिवाय, मौजे गळवेवाडी येथे गट नं. १४४/२, १४८, १४५, १४९/२ व गट नं. १९ तसेच मौजे पिसेवाडी येथील गट नं. २६२/२, २३८/१, २६२/१ या मिळकतीमध्ये जाबदेणार क्र. १ चा हिस्सा असल्याबाबतचे ७/१२ उतारे अर्जदारने न्यायालयात दाखल केले आहेत. सदर उता–यांवरुन वर नमूद मिळकतीमध्ये डाळींब या पिकांचे उत्पन्न घेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे जाबदेणार क्र. १ हा अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

८. जाबदेणार क्र.१ हा अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्यास सक्षम असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती, जाबदेणार क्र.१ याचे मासिक उत्पन्न, अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचे सामाजिक स्थान व प्रचलित राहणीमान, अर्जदार यांना उपजिवीका भागविण्यासाठी लागणारा खर्च, इत्यादी बाबींचे काळजीपुर्वक अवलोकन करता या अंतरीम टप्प्यावर जाबदेणार क्र.१ याला प्रस्तूत अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २१.०५.२०१८ पासून ते मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यत अर्जदार हिस दरमहा रु २०००/– अंतरीम पोटगी देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचीत ठरेल.

९. जाबदेणार क्र. १ याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदारने मागणी केलेप्रमाणे ती जाबदेणार क्र. १ विरुध्द त्याने कौटुंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करु नये तसेच अर्जदार रहात असलेल्या घरात प्रवेश करु नये असा अंतरिम आदेश मिळणेस देखील अर्जदार पात्र आहे. परंतु, जाबदेणार क्र. १ हा अर्जदारचा हक्क डावलून स्थावर अगर जंगम मिळकतीची विक्री करत असल्याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा अर्जदारने सादर केलेला नाही. त्यामुळे जाबदेणार क्र. १ ने स्थावर अगर जंगम मालमत्ता विक्री करु नये असा अंतरिम आदेश मिळणेस अर्जदार पात्र नाही. सबब, मुद्दा क्र. २ चे

उत्तर अंशतः होकारार्थी देवून मुद्दा क्र. ३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तूचा अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदेणार क्र. १ प्रमोद धोंडीबा गळवे याने मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यत अर्जदार रोहिणी प्रमोद गळवे हिस दरमहा रक्कम रु. २०००/– अंतरीम पोटगी म्हणून अर्ज दाखल केल्याचे तारखेपासून म्हणजेच दिनांक २१.०५.२०१८ पासून दयावी.

३. जाबदेणार क्र. १ याने अर्जदार विरुध्द कोणतेही कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करु नये तसेच ती रहात असलेल्या घरामध्ये प्रवेश करु नये असा अंतरिम प्रतिबंधात्मक आदेश जाबदेणार क्र. १ यास देण्यात येतो.

४. प्रस्तूत अर्जाचा खर्च रक्कम रु. १०००/– जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिस दयावा.

५. प्रस्तूत आदेशाची प्रत उभयपक्षांना त्यांचे लेखी विनंतीवरुन विना शुल्क देण्यात यावी.

६. प्रस्तूतच्या आदेशाचे निवेदन खुल्या न्यायासनासमोर अधिघोषीत केले.

**(पी.ए. पाटील)**

दिनांकः १९.१२.२०१९ **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Shri. P.A. Patil,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19.12.2019 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19.12.2019 |